# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## भवन्स विद्या मंदिर शाळेची मेट्रो भवनला भेट




नागपूर: नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाले असून, महा मेट्रो नागपूरने ही मेट्रो ट्रेनच्या वेळापत्रकामध्ये बदल केले असून दर १० मिनिटांनी मेट्रो सेवा कार्यान्वित केल्या आहे ज्यामुळे नागरिकांचा कौल हा मेट्रोकडे वाढत आहे.ज्यामध्ये शैक्षणिक विद्यार्थी मोठ्या प्रमाणात मेट्रोचा उपयोग करीत आहे.महा मेट्रोच्या वतीने नागपुरातील शाळा आणि कॉलेजमध्ये शिबिराच्या माध्यमाने अनेक उपक्रम राबवत जनजागृती केल्या जात असून या उपक्रमा अंतर्गत आज दिनांक २६ जुलै रोजी भवन्स विद्या मंदिर,चिंचभवन शाळेच्या विद्यार्थ्यांनी मेट्रो भवनला भेट दिली.

महा मेट्रोच्या वतीने विद्यार्थ्यांना संपूर्ण मेट्रो भवन दखवत मेट्रो रेल प्रकल्पाची माहिती तसेच मेट्रो भवन येथील कंट्रोल सेंटर येथे मेट्रो संचलानाबद्दल तांत्रिकी माहिती देण्यात आली यानंतर

विद्यार्थ्यांनी खापरी मेट्रो स्टेशन आणि मिहान डेपोला भेट देत मेट्रो रेल प्रकल्पाचे संचालन कश्याप्रकारे केले जाते व मेट्रो डेपो येथे काय कार्य केले जाते या संदभार्त माहिती जाणून घेतली.

मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी मेट्रोचे खांब, स्पॅन, गर्डर, डबल डेकर व्हायाडक्ट, चतुःस्तरीय परिवहन प्रणाली आणि मेट्रो स्थानकांच्या बांधकामाबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रश्नांना मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. नागपूर मेट्रोची उभारणी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले, आज खूप काही शिकायला मिळाले अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

- मेट्रो विद्यार्थ्यांना आकर्षित करते

शाळा, महाविद्यालये, अभियांत्रिकी, नागपूर मेट्रोसाठी बांधकाम, स्थानक इमारती, गाड्यांचे संचालन, डबल डेकर आणि बहुस्तरीय वाहतूक व्यवस्था, सौर ऊर्जा, पर्यावरण आणि हरित मेट्रो या क्षेत्रात महामेट्रोने केलेले कार्य जाणून घेण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी. विद्यार्थी, परिसरातील शिक्षक आणि प्राध्यापक आकर्षित होत आहेत. राज्याव्यतिरिक्त आंतरराज्यीय शैक्षणिक संस्थांचे विद्यार्थी अभ्यासासाठी मेट्रो भवनात पोहोचले आहेत.

मेट्रो भवनातील नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या मॉडेलची पाहणी केल्यानंतर विद्यार्थ्यांना बांधकामाविषयी माहिती देणारे व्हिडीओ दाखवण्यात आले. त्यानंतर लायब्ररी आणि पाचव्या मजल्यावरील गॅलरी पाहिल्यानंतर सविस्तर माहिती घेण्यासाठी विद्यार्थी सभागृहात पोहोचले. यावेळी मेट्रो ट्रेनच्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. महामेट्रोकडून वर्धा मार्गावर बांधण्यात आलेल्या डबल डेकरची तांत्रिक माहिती देण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग आणि व्हायाडक्टवरील मेट्रो रेल्वेच्या बांधकामाची वैशिष्ट्ये अतिशय बारकाईने समजून घेतली. कामठी मार्गावर बहुस्तरीय वाहतूक व्यवस्था उभारण्यासंदर्भातील व्हिडिओ पाहून विद्यार्थी आश्चर्यचकित झाले. असे बांधकाम आपण प्रथमच पाहत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी व्हायाडक्टच्या बांधकामाबाबत तांत्रिक ज्ञान मिळवले. नागपूर प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याच्या बांधकामाबाबतही तपशील देण्यात आला. महामेट्रोतर्फे नागपूर, पुणे, नवी मुंबई येथे सुरू असलेल्या कामांची माहिती मुलांना देण्यात आली.